**दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला यांचे न्यायालयात**

**नियमित दिवाणी मुकदमा क्र. २८६/२०१२**

**निशाणी ६२ लगत आदेश**

(मौला उर्फ मोहन व इतर वि. ज्ञानेश्वर व इतर)

प्रस्तुत अर्ज वादी यांनी मुद्दा क्र. १ पुर्नगठीत करणेसाठी दिलेला आहे.

०२. अर्जात वादीचे कथन की, प्रस्तुत दाव्यात नि. क्र. ४० ला मुद्दे काढलेले आहेत. सदर मुद्यापैकी मुद्दा क्र. १ वादीचे म्हणणे प्रमाणे दावा मिळकत गट क्र. २७१ पैकी पश्चिम बाजूची ८० आर ही वादीचे स्वतंत्र मालकीची व वहिवाटीची आहे असे आहे. त्यामुळे मुद्दा क्र. १ हा रिकास्ट होवून पुढीलप्रमाणे काढण्यात यावा.

''Do plaintiff prove that suit land Gat no. no. 271 is separately owned and possessed by him?

०३. प्रतिवादीने सदर अर्जावर म्हणणे देवून वादीचा अर्ज नाकारला आहे. प्रतिवादीचे कथन की, सदर दावा प्रतिवादी विरुध्द दावा मिळकतीची मोजणी होवून अतिक्रमण जमिनीचा कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. दावा जमीन ही सामाईक वादी प्रतिवादी यांचे मालकीची असल्याने वरीलप्रमाणे मुद्दा काढता येणार नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

०४. अभिलेख पाहिले असता असे दिसून येते की, वादी यांनी त्यांचे वादपत्रात

उतारा क्र. २ मध्ये कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी क्र. २ यांचे एकत्र हिंदू कुटुंबाचे गट क्र. २७१ मध्ये १ हे. २१ आर क्षेत्राची मालकी व कब्जे वहिवाट एकत्रीतपणे आहे. सदरची बाब वादीने त्यांच्या वादपत्रात नमुद केलेली आहे. वादी जर त्यांच्या वादपत्रात १ हे २१ आर क्षेत्राबाबत त्यांची कथने कथन करत असतील तर त्यांना पुन्हा ८० आर क्षेत्राबाबत वेगळा मुद्दा काढून त्यांच्या मालकी व वहिवाटीची आहे असे म्हणता येणार नाही व तसा मुद्दाही काढता येणार नाही. माझे पुर्वाधिकारी यांनी वादीच्या वादपत्रातील कथनास अनुसरुन मुद्दा क्र. १ समाविष्ट केलेला आहे. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १४ मधील तरतुदींचे पालन करता वादीच्या अर्जानुसार नि. क्र. ४० वर काढलेल्या मुद्यापैकी मुद्दा क्र. १ हा नव्याने बदल करुन काढता येणार नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

**<u>आदेश</u>**

वादीचा नि. क्र. ६२ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

सांगोला. (श्री. संजय मो. घुगे)

दिनांक. २२/११/२०२४. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला.